जा. क्र.आसंउकें/रामेश्वर/ ७२ /२०२३
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.
मु. पो. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
मो.नं- ९३७०९७५८१८
दिनांक – ०९/०५/२०२३

प्रति,

__________________
__________________
__________________

विषय:– तणनाशक खरेदी करण्याचे दरपत्रक ....

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र रामेश्वर, या संशोधन केंद्राच्या आंबा बागेमध्ये तसेच रोपवाटिकेमध्ये पावसाळ्यात तणांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होतो. तसेच पावसाळी हंगामामध्ये गवत व झुडपे वाढल्यास या ठिकाणी वन्य प्राण्यांची भीती असते. नियमित वावर होण्यासाठी तणांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. ही कामे प्राधान्याने करावयाची असून आवश्यक मजुरबळ या संशोधन केंद्रावर उपलब्ध नाही. तणाचे व्यवस्थितपणे नियंत्रण होणेसाठी एकत्रित तण व्यवस्थापण पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे. सदर तणनाशक खरेदी करण्याचे दरपत्रक २९ / ०५ / २०२३ पर्यंत निम्नस्वाक्षरीकार यांचे नावे या कार्यालयात मागविण्यात येत आहे. सदर लखोटा सिलबंद असणे आवश्यक असून लखोटावर 'तणनाशक खरेदी करण्याचे दरपत्रक' असा उल्लेख करावा.

| अ.क्र | तपशिल | खरेदीचे प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ग्रमेक्झोन | ५० लिटर | 'तणनाशक खरेदी करण्याचे दरपत्रक' आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर येथे पोहोच असावे. (खर्च, वाहतूक, हमाली व इतर खर्चाच्या बाबीविषयी सविस्तर खुलासा दरपत्रकात करण्यात यावा.) |
| २ | ग्लायफोसेट ४१ % | ६० लिटर | |

अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. सदर दरपत्रक मोहरबंद असणे आवश्यक आहे.

२. साहित्यासंबधी विस्तृत माहिती छापील पत्रकासह द्यावी.

३. दरपत्रक सुमारे ३ महिन्यापर्यंत वैध असावे.

४. साहित्यासंबधी विविध कर, बांधणी खर्च,वाहतूक, हमाली व इतर खर्चाच्या बाबीविषयी सविस्तर खुलासा दरपत्रकात करण्यात यावा.

५. बिलाची रक्कम अदा करण्यासबंधी आपल्या काही अडचणी असल्यास त्याचा स्पष्ट खुलासा करावा.

६. आपण स्वत: उत्पादक किंवा कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्यास त्यासंबधीचा योग्य तो दाखला तसेच कंपनीची छापील दरसूची सोबत द्यावी.

७.दरपत्रक विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. टपाल दिरंगाईस/विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

८. दरपत्रके नाकारण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार याकार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

९. सदर रकमेवर आयकर भरल्याची पावती अथवा हमीपत्र द्यावे लागेल.

आपला विश्वासू

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उप-केंद्र, रामेश्वर
ता देवगड जि. सिंधुदुर्ग